वि.दि.दावा क्र ०५/२०२४

विमलबाई वि सुभद्राबाई

<u>आदेश नि ४१</u>

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दाखल केला असून प्रस्तावीत दुरुस्तीने वादपत्रातील नकाशा आणि गट क्रमांक २६२ मधील मजकूराबाबत कथने नमुद करायची आहेत. याकाम अद्यापी मुददे काढलेले नाहीत. त्यामुळे अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती करण्यात आली.

प्रतिवादी १ ने दिलेल्या म्हणण्यानुसार प्रस्तावीत दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलत असून ती करण्याचे कारण अर्जात नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

मुळ दावा हा हक्क ज्ञापन किंवा अग्रहक्क मागणी आणि खरेदीपत्र रददबातल करुन मागण्याचा असून याकामी अद्यापी मुददे निघाले नाहीत. प्रस्तावीत दुरुस्ती ही दाव्यातील गट क्रमांकाबददल आणि दाव्यासोबतच्या हातनकाशाच्या अनुषंगाने असल्याने त्याबददल अतिरिक्त कैफियत प्रतिवादी देवू शकतात. दुरुस्ती दाव्याच्या तारखेस दाव्यासोबत येत असल्याने आणि या दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपावर फरक पडत नसल्याने ती मंजूर करण्यात येते. सबब आदेश

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो

२. दुरुस्ती तातडीने वादपत्रात करुन घ्यावे आणि विशुध्दीत वादपत्र सादर करावे.

दिनांकः १३/०३/२०२६

स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर